# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.12.2025** **वार:सोमवार**

1. नवी उमेद आणि नव्या संकल्पासह 2026मध्ये पुढे जाण्यासाठी देश सज्ज असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचितबहुजन आघाडीमध्ये युतीची घोषणा
3. पिंपरी चिंचवडमध्ये आजपासून राज्यस्तरीय युवा महोत्सवाला सुरुवात आणि
4. श्रीलंकेविरुद्ध वीस षटकांच्या चौथ्या सामन्यातही भारतीय महिला संघाचा विजय.

**मन की बात**

संरक्षण, विज्ञान, अंतराळ, क्रीडा अशा विविध क्षेत्रांच्या दृष्टीनं 2025 हे वर्ष भारतासाठी संस्मरणीय ठरलं, अनेक अभिमानाचे क्षण या वर्षानं दिले; आता नवी उमेद आणि नव्या संकल्पासह 2026 मध्ये पुढे जाण्यासाठी देश सज्ज आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मन की बातच्या 129व्या भागात काल त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. सरत्या वर्षातील अनेक घटनांच्या आढावा घेत त्यांनी सर्वांना नव्या वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. आजचा भारत आपल्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड करत नाही, हे, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतानं जगालासांगितलं. प्रयागराज इथं झालेला महाकुंभ, अयोध्येत श्रीराम मंदिरावरचं ध्वजारोहण, वंदे मातरम या गीताची 150वी वर्षपूर्ती, तसंच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा त्यांनी आढावा घेतला. देशातल्या युवा शक्तीमुळे जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे असं पंतप्रधान म्हणाले.

पुढच्या महिन्यात आपण देशाचा 77वा प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत; अनेक ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिक आणि संविधान निर्मात्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे असं पंतप्रधान म्हणाले. आपल्या देशातील वैशिष्ट्यपूर्ण कला आणि समृद्ध संस्कृतीच्या रक्षणासाठी देशाच्या विविध भागात होत असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. अँटीबायोटिक औषधांच्या अविचारी वापरामुळं निर्माण झालेल्या धोक्याविषयी पंतप्रधानांनी कालच्या मन की बातमध्ये चिंता व्यक्त केली. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच ही औषधं घ्यावीत असं आवाहनही मोदी यांनी केलं. ते म्हणाले......

**मैं आप सभी से आग्रह करता हूँ कि कृपया अपनी मनमर्जी से दवाओं का इस्तेमाल करने से बचें | Antibiotic दवाओं के मामले में तो इस बात का ध्यान रखना बहुत जरूरी है | मैं तो यही कहूँगा - Medicines के लिए Guidance और Antibiotics के लिए Doctors की जरूरत है | यह आदत आपकी सेहत को बेहतर बनाने में बहुत मददगार साबित होने वाली है |**

**काँग्रेस वंचित बहुजन आघाडी**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीनं काल आघाडीची घोषणा केली. मुंबईतल्या 227 जागांपैकी 62 जागा वंचित आघाडी लढवणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित आघाडीचे नेते धैर्यवर्धन पुंडकर यांनी काल संयुक्त वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली.

जळगांव महापालिकेसाठी महाविकास आघाडीनं काल जागावाटप जाहीर केलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष 38 तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष 37 जागा लढवणार आहे. महाविकास आघाडीतील इतर घटक पक्षांनाही सोबत घेणार असल्याचं माजी आमदार संतोष चौधरी यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

**महापालिका-निवडणुका**

दरम्यान राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी फक्त दोन दिवस शिल्लक असून अनेक शहरांत युती आघाडीबाबत राजकीय पक्षांमधील चर्चा सुरु आहेत. पुणे महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामधील आघाडीबाबत अजूनही स्पष्टता नाही, महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या चर्चेच्या फेऱ्या कालही सुरूच होत्या. पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी दोन्ही राष्ट्रवादींची आघाडी झाल्याचं अजित पवार यांनी काल जाहीर केलं.

**भाजप-शिंदे पवार चर्चा-सोलापूर**

सोलापूर महापालिकेसाठी महायुतीतील पक्ष एकत्रित निवडणूक लढवणार नसल्याचे स्पष्ट झालं आहे. भाजपकडून सन्मानजनक प्रस्ताव आला नसल्याने, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वातीलराष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित निवडणुका लढवतील. महापालिकेच्या 51 जागा शिंदे सेना आणि 51 जागा राष्ट्रवादी अजित पवार पक्षाने लढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**नाशिक**

नाशिक महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट तसंच अजित पवार यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष यांच्यात स्थानिक पातळीवर पुन्हा चर्चा सुरू झाल्या आहेत. महाविकास आघाडीतील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट, कॉंग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांची एकत्रीत बैठक कॉंग्रेस खासदार शोभा बच्छाव यांच्या निवासस्थानी झाल्या.

**काँग्रेस स्थापना**

काँग्रेस पक्षाचा काल 140वा स्थापना दिवस होता. या निमित्ताने दिल्लीतील मुख्यालयात पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ध्वजारोहण केले. यावेळी काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते उपस्थित होते. काँग्रेस हा विचारसरणीचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष असून, विचारसरणी कधीही मरत नाही, असं मत खरगे यांनी याप्रसंगी व्यक्त केले. मुंबईत टिळक भवन इथल्या पक्ष कार्यालयातही काल काँग्रेस स्थापना दिना निमित्त कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले. देशाला आज काँग्रेसच्या विचारांची गरज असल्याचं प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यावेळी म्हणाले.

**संरक्षण सिद्धता 2025**

2025 हे वर्ष भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या धोरणाला निर्णायक स्वरूप देणारं वर्ष म्हणून ओळखलं जाईल. 'सुधारणांचे वर्ष' या विशेष मालिकेत, आज 2025 मध्ये संरक्षण क्षेत्रात भारतानं घेतलेल्या ठाम निर्णयांबाबत ऐकुया माझ्या सहकारी विजयालक्ष्मी साळवी यांच्याकडून...

**जागतिक पातळीवर अनिश्चिततेचं वातावरण असतानाही 2025 मध्ये भारतानं संरक्षण क्षेत्रात अत्यंत आत्मविश्वासाने, महत्त्वपूर्ण आणि ठाम निर्णय घेतले. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वभौमत्वाचं कोणत्याही परिस्थितीत रक्षण केलं जाईल असा स्पष्ट संदेश भारतानं दिला. दहशतवादाला कठोर कारवाईतून उत्तर दिलं जाईल हे ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून संपूर्ण जगाला ठणकावून सांगितलं. यापुढे भारत दहशतवादाला ठाम प्रत्युत्तर देईल, आण्विक हल्ल्यांच्या धमकीला बळी पडणार नाही, दहशतवादी आणि दहशतवाद्यांना पाठीशी घालणाऱ्यामध्ये भेद केला जाणार नाही, दोन देशांमधील परस्पर संवादात दहशतवाद हाच पहिला मुद्दा असेल, दहशतवाद आणि वाटाघाटी एकाच वेळी होणार नाहीत हे पाच मुद्दे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची दहशतवादाविरोधातील भूमिका ठामपणे मांडली. ऑपरेशन सिंदूरमध्ये वापलेली ब्राम्होस क्षेपणास्त्र आणि अन्य बहुतांश संरक्षण सामुग्री स्वदेशी बनावटीची होती. यंदाच्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारनं संरक्षण क्षेत्रासाठी मोठी आर्थिक तरतूद केली आहे. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेसाठी आणि आधुनिकीकरणासाठी 2025 मध्ये 4 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अधिग्रहण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. एकंदरीतच लष्कर, नौदल आणि हवाई दलांच्या सज्जतेच्या दृष्टीनं 2025 हे वर्ष महत्त्वपूर्ण ठरलं आहे.**

**राज्ययुवा महोत्सव**

पिंपरी चिंचवड इथं आजपासून राज्यस्तरीय युवा महोत्सवाला सुरुवात होणार आहे. निगडीच्या ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात होणाऱ्या महोत्सवात अधिकाधिक युवक-युवतींनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केलं आहे. युवकांचा सर्वांगीण विकास साधणे, भारतीय संस्कृती व परंपरेचे जतन करणे, युवकांमधील सुप्त गुणांना वाव देणे तसेच राष्ट्रीय एकात्मता बळकट करणं या उद्देशानं या महोत्सवाचं आयोजन करण्यात येते.

**क्रिकेट**

भारतीय महिला क्रिकेट संघानं काल श्रीलंकेविरुद्धचा 20 षटकांचा चौथा सामना 30 धावांनी जिंकला. तिरुअनंतपुरम इथं झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतीय महिलांनी 20 षटकांत 221 धावा केल्या. त्याला उत्तर देताना श्रीलंकेला 20 षटकांत 191 धावा करता आल्या. 87 धावा करणारी स्मृती मानधना सामनावीर ठरली. तिनं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधल्या दहा हजार धावांचा टप्पा पार केला.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील. किमान तापमानातही काहीशी घट होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.